ePaper

वर्ष - 8 । अंक -109 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दि. 27 ऑक्टोंबर 2024 | पुणे-पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मविआचा नवा फॉर्मुला, आता तिन्ही पक्षांना प्रत्येकी 90 जागा



## आतील पानांत


- विजयानंतर टॉम लॅथम भारावला
- गावस्कर मालिकेसाठी संघ जाहीर
- टाटांनी कोटींची संपत्ती सोडली!
- भारतीय कामगारांची आवश्यकता का?


## महाविकास आघाडीचे जागावाटप

# पिंपरी-भोसरीचा तिढा सुटला!

### पिंपरीत सुलक्षणा धर, भोसरीत अजित गव्हाणे

।पुणे।महाईन्यूज।प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवडच्या तिन्ही विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांची घोषणा करण्याच्या प्रक्रियेत शरद पवार गटाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर, अनेक पदाधिकारी अजित पवार यांच्या गटासोबत राहिल्यामुळे, शरद पवार गटाने उमेदवारीच्या इच्छुकांना उमेदवारी जाहीर करण्यात व एबी फॉर्म मिळवण्यात उठाबशा काढायला लावल्या. शेवटी पिंपरीतून सुलक्षणा धर आणि भोसरीतून अजित गव्हाणे यांचे नाव निश्चित करण्यात आले. मात्र, अद्याप चिंचवडमधून कुणाला उमेदवारी मिळाणार ? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**

अजित पवार गटाचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांच्यापुढे शरद पवार गटाच्या सुलक्षणा शीलवंत-धर यांचं आव्हान असणार आहे. शरद पवार गटाच्या दुसऱ्या यादीत त्यांचं पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी नाव जाहीर करण्यात आलं. गेल्या काही दिवसांपासून अनेक नाव पिंपरी विधानसभा मतदार संघासाठी पुढे येत होती. अखेर आज सुलक्षणा शीलवंत-धर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे.

पिंपरी विधानसभा मतदारसंघात अजित पवार गटाचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे विरुद्ध शरद पवार गटाच्या सुलक्षणा शीलवंत- धर असा सामना रंगणार आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघ हा महाविकास आघाडीतून शिवसेना ठाकरे गटाला सुटण्याची शक्यता वर्तवली जात होती. यासाठी अनेक जणांनी फिल्डिंग देखील लावली. शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामटे यांच्या समर्थक असलेल्या आणि निकटवर्तीय असलेल्या सुलक्षणा शीलवंत-धर या गेल्या काही महिन्यांपासून पिंपरी विधानसभेसाठी तयारी करत होत्या. परंतु, ऐनवेळी पिंपरी विधानसभा मतदारसंघातून वेगवेगळी नावे समोर येत होती. त्यामुळे पिंपरी विधानसभा मतदारसंघातून कोणाला उमेदवारी मिळणार यावरून उत्कंठा होती. अखेर पिंपरी विधानसभा मतदारसंघातून सुलक्षणा शीलवंत-धर यांना उमेदवारी मिळाल्याने या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. आता थेट राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे विरुद्ध शरद पवार गटाच्या सुलक्षणा शीलवंत- धर अशी लढत होणार आहे.

दरम्यान, रात्री उशीरा भोसरी मतदार संघातून अजित गव्हाणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे महायुतीचे आमदार महेश लांडगे विरुद्ध अजित गव्हाणे अशी लढत निश्चित होणार आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाकडून इच्छुक असलेले रवि लांडगे यांना २०२९ ची वाट पहावी लागणार आहे.




# कोण होणार चिंचवडचा शिलेदार?

## कलाटे-काटे यांच्यात रस्सीखेच...

**चिंचवड विधानसभा मतदार संघातून माजी नगरसेवक राहुल कलाटे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, भाउसाहेब भोईर, चंद्रकांत नखाते असे नेते इच्छुक आहेत. यामध्ये कलाटे आणि काटे यांच्यामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारीवरुन जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे चिंचवडची जागा ठाकरे गटाला मिळणार की शरद पवार गटाला मिळणार... यासह उमेदवार कोण असणार? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**




।पुणे।महाईन्यूज।प्रतिनिधी

**बनावट कंपनीच्या नावे कागदपत्रे सादर करून पाच ते आठ हजार कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कर चुकविण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.वस्तू आणि सेवा कर विभागाच्या पुणे कार्यालयाने ही कारवाई केली असून, कोरेगाव पार्क ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

# पुण्यात हजारो कोटींची कर चुकवेगिरी

### गुजरातमधून मुख्य सूत्रधार अटकेत

कर चुकवेगिरी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार गुजरातमधील असल्याचे उघडकीस आले असून, त्याला अटक केली आहे. याप्रकरणी आठजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत जीएसटी पुणे विभागाच्या कार्यालयातील अधिकारी ऋषी प्रकाश (वय ३९) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी अश्रफभाई इब्राहिमभाई कालवाडिया (वय ५०, रा. अल्टीमेट रान्डेर रोड, सूरत, गुजरात), नितीन भागोजी बर्गे (रा. ओम साई गणेश सोसायटी, कामराजनगर, घाटकोपर, मुंबई), फैजल अब्दुल गफार मेवावाला (रा. बुर्ज अश्रफी, कांबेकर स्ट्रीट, मुंबई), निजामुद्दीन मोहम्मद सईद खान (रा. मराठी हायस्कूलच्यामागे, दिवा रस्ता, भिवंडी), अमित तेजबहादुर सिंग (रा. सेंच्युरी रेयॉन कॉलनी, मुरबाद रोड, उल्हासनगर, मुंबई), राहुल बटुकभैय्या बरैय्या, कौशिक भूपतभाई मकवाना, जितेंद्र मुकेशभाई गोहेल यांच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा प्रचार 'वेगात'

## उमेदवारांच्या प्रचारासाठी 150 एलईडी व्हॅन महाराष्ट्रभर फिरणार!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसने विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आणखी वेग दिला असून, पक्षाचे कर्तृत्व आणि आश्वासने मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्षाने १५० एलईडी व्हॅन मैदानात उतरवल्या आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पक्षाच्या निवडणूक 'कॅम्पेन एलईडी व्हॅन'ला हिरवा झेंडा दाखवला.**



राष्ट्रवादी काँग्रेसने समाजातील विविध घटकांसाठी केलेली विकासकामे आणि लोकाभिमुख निवडणुकीतील आश्वासने लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या एलईडी व्हॅन राज्यभर फिरणार आहेत. ऑडिओ-व्हिडिओ प्रचार साहित्यासह राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे लढविल्या जाणाऱ्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तीन एलईडी व्हॅन फिरून अजित पवार यांनी हाती घेतलेल्या कल्याणकारी कामांचा प्रसार करणार आहेत.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, या एलईडी व्हॅनमध्ये महिलांना १५०० रुपयांची आर्थिक मदत देणारी लाडकी बहिण योजनेची माहिती देण्यात आली आहे, अडीच कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून बळीराजा विज सवलत योजनेच्या माध्यमातून सरकार ४४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना वीज माफी देत आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणासाठी काम करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला आणि राज्यातील जनतेच्या सेवेसाठी महायुती पुन्हा सत्तेत येईल, असा विश्वास व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीत जागा जिंकण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादीचा स्ट्राईक रेट चांगला असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### पक्षाकडून हायटेक प्रचार यंत्रणा...

गेल्या काही आठवड्यांपासून राष्ट्रवादीच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, विविध पक्षांच्या डझनभर प्रमुख नेत्यांनी पक्षात प्रवेश केला आहे. काँग्रेसचे विद्यमान आमदार झिशान सिद्दीकी (वांद्रे पूर्व), सुलभा खोडके (अमरावती) आणि हिरामण खोसकर (इगतपुरी) यांनी पक्षात प्रवेश केला. काँग्रेसचे ज्येष्ठ आदिवासी नेते भरत गावित यांनीही पक्षात प्रवेश केला आहे. शिवसेना उबाठा पुणे जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) आबा कटके, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार कल्याणराव पाटील आदींनी देखील पक्षात प्रवेश केला आहे. ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी पक्षात प्रवेश केला असून ते पक्षाच्या २७ स्टार प्रचारकांपैकी एक आहेत. यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षाचे मनोबल वाढले आहे. प्रचाराच्या हायटेक पद्धतीच्या माध्यमातून आपला संदेश थेट मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा पक्षाचा उद्देश आहे.

---

# खडकवासला मतदार संघात तिरंगी लढत

## शरद पवार गटाकडून सचिन दोडके अन् मनसेकडून मयुरेश वांजळे मैदानात

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भाजप आणि शरद पवार गटाने आपली दुसरी यादी जाहीर केली आहे. दुसऱ्या यादीमध्ये भाजप आणि शरद पवार गटाकडून २२ उमेदवारांची घोषणा केली आहे. दोन्ही याद्या जाहीर झाल्यावर आता अनेक जागांवरील उमेदवारीचा पेच सुटला आहे.**



अनेक जागांवर महायुती किंवा महाविकास आघाडीकडून कोणत्या उमेदवाराला संधी दिली जाते याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. भाजप आणि पवार गटाने काही मिनिटांच्या अंतरामध्ये आपल्या याद्या जाहीर केल्याने आता कोणामध्ये लढत होणार हे स्पष्ट झालं आहे. त्यापैकी एक पुण्यातील चर्चेत राहिलेल्या खडकवासला मतदारसंघातील आमने-सामने असणारे उमेदवार आता निश्चित झाले आहेत. खडकवासला मतदारसंघात भाजप-शरद पवार गट- मनसेमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

महाविकास आघाडीमध्ये शरद पवार गटाकडून सचिन दोडके यांना तिकिट देण्यात आलं आहे. तर भाजपने पुन्हा एकदा विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांना उमेदवारी दिली आहे. तर याआधी मनसेने दिवंगत माजी आमदार रमेश वांजळे यांचे सुपुत्र मयुरेश वांजळे यांना उमेदवारी दिली होती. गेल्या अनेक दिवसांपासून खडकवासला मतदारसंघामध्ये मोठा सस्पेन्स पाहायला मिळत होता. विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांची उमेदवारी गॅसवर असल्याचं पाहायला मिळालं होतं. कारण खडकवासला आणि वडगाव शेरी हे मतदासंघ भाजप आणि अजित पवार गट अदलाबदल करून घेणार असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र दादांनी पुन्हा सुनील टिंगरे यांना उमेदवारी देत या चर्चांणा पूर्णविराम दिला.

**हडपसरमध्ये चुरस...**

महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपात हडपसर मतदारसंघ दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेला आहे. त्यामुळे येथेही चुरस निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी-अजित पवार पक्षाने येथून विद्यमान आमदार चेतन तुपे यांना पुन्हा संधी दिली आहे. तर, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्याच वेळी या मतदारसंघावर शिवसेनेच्या दोन्ही गटांनीही दावा केला होता. त्यात शिवसेना- शिंदे पक्षाचे शहरप्रमुख प्रमोदनाना भानगिरे इच्छुक होते. मात्र, त्यांनी आता माघार घेतली आहे. मात्र, शिवसेना ठाकरे गटाकडून माजी आमदार महादेव बाबर अपक्ष म्हणून मैदानात उतरण्याची चिन्हे आहेत. लोकसभा निवडणुकीत बाबर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांचा प्रचार केला होता. मात्र, आता बाबर यांना डावलण्यात आल्याने ते लढण्याच्या तयारीत आहेत. तर मनसेकडूनही शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांना उमेदवारी देण्यात आल्याने या मतदारसंघात चुरशीची लढत होणार आहे.

### मतदार संघात काँटे की टक्कर...

आता खडकवासला मतदासंघामध्ये तिरंगी लढत होणार आहे. या लढतीकडे राज्याचं लक्ष लागलेलं असणार आहेय. २०१९ च्या निवडणुकीमध्ये भीमराव तापकीर आणि सचिन दोडके हे उमेदवार रिंगणात उतरले होते. या मतदारसंघात एकदम काँटे की टक्कर पाहायला मिळाली होती. राष्ट्रवादीकडून उभे असलेल्या सचिन दोडके यांचा या निवडणुकीमध्ये अवघ्या २५९५ मतांनी पराभव झाला होता. आता शरद पवार गटाकडून सचिन दोडके यांनी पुन्हा एकदा उमेदवारी दिली गेली आहे. त्यासोबतच मनसेकडून मुयुरेश वांजळे यंदा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या तिरंगी लढतीमध्य जनता कोणाला गुलाल उधळण्याची संधी देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# नागेश्वरांची शपथ; मोशीत एकोपा ठेवणार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा संवाद मेळावा दणक्यात

। भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**१० वर्षे गायब असणाऱ्यांना माझ्याविरोधात बोलण्यास एकही मुद्दा नाही. सरसकट शास्तीकर माफीचे विरोधकही लाभार्थी आहेत. त्याची फलक लाऊन माहिती दिली जाईल. "नागेश्वर महाराजांची शपथ... मोशी गावातील एकोपा कायम ठेवणार, असा विश्वासही भोसरी विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांनी दिला आहे.**



भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी कॉंग्रेस- आरपीआयसह मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ मोशीत संवाद मेळावा घेण्यात आला. या सभेला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी नगरसेविका सारिका बो-हाडे, माजी नगरेविका अश्विनी जाधव यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, 1997 ते 2017 पर्यंत समाविष्ट गावाचा वनवास होता. तो 2017 मध्ये संपला आहे. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर विकासाची गंगा आली. समाविष्ट गावांचा कायापालट झाला. च-होलीत, मोशीकरांचे भाग्य चांगले असल्याने दोन महापौर मिळाले. पूर्वेला नितीन काळजे आणि पश्चिमेला राहुल जाधव महापौर झाले. दोघेही पूर्वी नगरसेवक होते. परंतु, स्थानिक नेतृत्वामुळे त्यांना काम करण्याची संधी मिळत नव्हती. दडपशाही खाली दबावे लागत होते. आमची कामे होत नव्हती. जनतेला न्याय देऊ शकत नव्हतो. मोठ्या झाडाखाली वाढ होत नव्हती. त्यामुळे 2014 साली विधानसभा निवडणूक अपक्ष लढलो. जनतेने मोठी साथ देत विधानसभेत पाठविले.

### संतपीठ उभारल्याचे सार्थक झाले...

निर्णय घेण्याची क्षमता असलेले नेते असल्यावर शहराचा बाहेर जाऊन निर्णय घ्यावे लागत नाही. त्याची गरज काय आहे, शहरातील समस्या शहरातील नागरिकालाच माहिती असतात. त्या दूर कशा करायच्या हे शहरातील नागरिकालाच ठरवावे लागते. त्यामुळे दहा वर्षे बाहेर जावे लागले नाही. चिखलीत संतपीठ आणले. संतपीठमधील विद्यार्थी रामकृष्ण हरी म्हणून नमस्कार करू लागली. आपला अध्यात्मिक वारसा जोपासू लागले. भोसरी मतदारसंघातील समाविष्ट भागातील पाच गावांसाठी अंद्रा, भामा असखेड धरणातून 267 एमएलडी पाणी आणले. शास्तीकराचे मानगुटीवरील भूत उतरविले. सभागृहात भांडून 460 कोटी रुपये माफ करून घेतले. यापूर्वीचा आमदार सभागृहात बोलताना कधी पाहिला का?, असा सवालही त्यांनी केला.

---

# शंकर जगताप यांच्या महाविजयाचा संकल्प

## रहाटणी-सांगवी मंडलाच्या पदाधिकाऱ्यांचाही 'मास्टर प्लॅन'!

। चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयासाठी मतदारसंघातील प्रत्येक बुथच्या सक्षमीकरणावर भर द्या. प्रत्येक बुथवर ५१ टक्केपेक्षा जास्त मतदान मिळविण्यासाठी कामाला लागा. तसेच ज्या बुथवर मतदानाचा टक्का कमी आहे त्या बूथवर अधिक मतदान कसे होईल यावर भर द्या, अशा सूचना गुजरातचे आमदार राकेश शहा यांनी दिल्या.**



पिंपळे गुरव, महालक्ष्मी लॉन्स याठिकाणी भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी कॉंग्रेस - आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयाची रणनीती ठरविण्यासाठी रहाटणी - सांगवी मंडलातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती केंद्रप्रमुख, बुथप्रमुख यांची बैठक संपन्न झाली.

या बैठकीला रहाटणी - सांगवी मंडल अध्यक्ष संदीप नखाते, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, माजी नगरसेविका सविता खुळे, माजी नगरसेवक सागर आंघोळकर, माजी नगरसेवक अंबरनाथ कांबळे, माजी नगरसेवक संतोष कांबळे, माजी नगरसेविका वैशाली जवळकर, माजी स्वीकृत सदस्य गोपाळ माळेकर, माजी स्वीकृत सदस्य महेश जगताप, राहुल जवळकर, गणेश नखाते, सखाराम रेडकर, दीपक जाधव, नरेश खुळे, सूर्यकांत गोफणे, संजय भोसले, विशाल माळी, अमर आदियाल, सुरेश तावरे, रमेश काशीद, रमेश जगताप, दीपक काशीद, शशिकांत दुधारे, स्वाती जाधव, नरेश जगताप, शिवाजी कदम, सारंग लोखंडे, आशिष जाधव, परिमल कडलग, राजू लोखंडे, स्वप्नील जाधव, प्रकाश लोखंडे यांच्यासह असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### महायुतीच्या विविध योजना...

या बैठकीत स्व. आमदार लक्ष्मण जगताप, आमदार अश्विनी जगताप व शंकर जगताप यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघात झालेली विकासकामे त्याचबरोबर केंद्र सरकार आणि महायुती सरकारच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या जनधन योजना, लाडकी बहीण योजना, मोफत गॅस सिलेंडर योजना, संजय गांधी निराधार योजना, पंतप्रधान आवास योजना, श्रावण बाळ योजना, पीएम किसान निधी योजना, संजय गांधी निराधार योजना या विविध लोककल्याणकारी योजना मतदारांसमोर मांडण्याच्या सूचना यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना





भूमिका

# कुठून कुठे जाणार हे इस्रायली?

**'कॅम्प' याच नावानं कला-प्रदर्शनांत सहभागी होणारं एक जोडपं मुंबईत आहे. शायना आनंद आणि अशोक सुकुमारन ही त्या दोघांची नावं. या दोघांनी सामाजिक स्थितीच्या 'दृश्य' आकलनाचा एक भारी मार्ग वापरला – 'आकलनविषय' ठरणाऱ्या समाजातल्याच माणसांना मोबाइल कॅमेऱ्यांतून शूटिंग करायला सांगायचं, ते तुकडे मग 'कॅम्प'नं जोडायचे.**

लाँचमधून थेट सोमालियापर्यंत मालवाहतूक करणाऱ्या खलांशाच्या साथीनं या 'कॅम्प'नं सिद्ध केलेला जीवनानुभवपट 'डॉक्युमेण्टा' महाप्रदर्शनात (२०१२) दाखवला गेला होता. याच प्रकारे, इस्रायली 'सेटलर' लोकांच्या वाढत्या पसाऱ्याच्या छायेत राहणाऱ्या सात पॅलेस्टिनी लोकांकडून २००९ ते २०११ या काळातलं सीसीटीव्ही मोबाइल- ध्वनिचित्रमुद्रण 'कॅम्प'नं मिळवलं होतं! 'नेबर बिफोर द हाउस' या नावानं तो लघुपट काही कला-प्रदर्शनांत प्रदर्शित झाला. या 'कॅम्प'च्या एकंदर कामाबद्दल जितकं लिहावं तितकं कमीच; पण सध्या महत्त्वाचं हे की, पॅलेस्टिनींबद्दल इतकी आस्था असलेल्या या 'कॅम्प'वाल्या कलावंतांनी याएल बर्ताना हिचा कार्यक्रम मुंबईत ठेवला होता. डिसेंबर २०१७ मध्ये हा कार्यक्रम मरोळच्या सिनेपोलीस सिनेमागृहात झाला.याएल बर्ताना हिनं कधीतरी (मुंबईत नाही),



स्वत:ची ओळख 'देशाच्या राजकीय सीमा न मानणारी ज्यू दृश्यकलावंत' अशीही करून दिली होती. तिनं फोटोग्राफीची पदवी इस्रायलमधूनच घेतली. पुढं शिकायला मात्र न्यू यॉर्कला गेली, तिथून ॲमस्टरडॅमच्या 'राइक्सअकॅडमी'त... या शिक्षणानंतर तिनं कल्पित असूनही सामाजिक/ राजकीय वास्तवाशी जबरदस्त संबंध असणारे लघुपट साकारले. राजकीय दुराग्रहांना त्यातून आव्हान दिलं. त्याहीपेक्षा, ''सांस्कृतिक ओळख आणि राष्ट्रवाद, वंश/ धर्म आणि राष्ट्रवाद यांचा चोथाच चघळून स्वत:चं आणि इतरांचंही नुकसान करणारे लहानपणापासून पाहिलेत मी" असं काहीतरी कलाप्रेक्षकांच्या डोळ्यांना तिच्या या कलाकृती सांगू लागल्याचा अनुभव आठवतो आणि याएल बर्तानाबद्दलचा आदर वाढतो.तिच्या कलाकृती बऱ्याच आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत, बिएनालेत वगैरे प्रदर्शित झाल्या आहेत. व्हेनिस बिएनालेत २०११ साली तिची 'ॲण्ड युरोप विल बी स्टन्ड' ही लघुपटत्रयी पोलंडच्या दालनात होत्या (या एकेका देशाच्या दालनासाठी 'पॅव्हिलियन' (इटालियन- 'पादिग्लिऑन') हा व्हेनिस बिएनालेत हमखास वापरला जाणारा शब्द). 'पोलंडहून दुसऱ्या महायुद्धकाळात बऱ्याच ज्यूंना स्थलांतर करावं लागलं. हे पोलंडला मायभूमी मानणारे ज्यू होते... अशा मूळ पोलिश ज्यूंची संख्या आज ३३ लाख आहे. ते सारे ज्यू लोक आपल्या मायभूमीत परत येऊन इथेच पोलंडमध्ये राहावेत, अशी आमच्या 'ज्यूइश रेनेसाँ मूव्हमेंट इन पोलंड' (जेआरएमआयपी) नामक चळवळीची मागणी आहे' अशी या कलाकृतीमागची कल्पना! ती कपोलकल्पित नाही... वास्तवाशी तिचा संबंध आहे, पण 'जेआरएमआयपी' ही चळवळ मात्र कल्पित. पोलंडमध्येच राहणारा एक वयस्कर ज्यू कार्यकर्ता आहे- या त्रयीपैकी एका लघुपटाचा बराचसा भाग त्याच्या भाषणाचा- "हीच आमची मायभूमी, इथंच आम्ही नांदू- इथून जावं लागलेल्यांनीही परत यावं"वगैरे एकदम फर्डं भाषण. ते त्याच्या कळकळीतून आलेलं, खरंखुरं. पण मुळात 'इस्रायल हीच आमची आश्वासित भूमी' म्हणत तिथं गेलेल्या ज्यूंना कोणी परत आणणार नाही, त्याअर्थी याएल बर्तानाची ही कलाकृती कल्पितावरच आधारलेली. तरीही अस्वस्थ करणारी. मायभूमी म्हणजे काय, देश कोणाचा असतो किंवा असायला हवा, जी बापजाद्यांनी पाहिलीसुद्धा नाही अशा भूमीला 'आमची हक्काची भूमी' म्हणत तिथलेच होण्यात- वर त्याचा दुरभिमान बाळगण्यात काय अर्थ आहे... असे प्रश्न या लघुपट त्रयीनं निर्माण केले. याएल बर्ताना स्वत: बर्लिन आणि ॲमस्टरडॅम इथं राहाते. तिनं पोलंडमध्ये २००७ पासून या लघुपटत्रयीचं काम करण्यासाठी बऱ्याच चकरा मारल्या, 'पॅव्हिलियन'मध्ये ही कलाकृती असल्यानं, 'आमच्या देशातर्फे ही कलाकृती आम्ही व्हेनिसच्या द्वैवार्षिक महाप्रदर्शनात यंदा धाडतोय' असं विधान आधीच झालेलं होतं.

## प्रासंगिक »

### भामटे आणि तोतये...

***नियम व कायदे मोडायचेच असतात असे मानणारा मोठा वर्ग समाजात तयार झाला आहे, यातले गांभीर्य कुणाच्या लक्षात येत नाही हीच आजची शोकांतिका आहे.***

महाठग अथवा तोतयांचे उगवणे हा काही समाजाला लागलेला नवा रोग नाही. इतिहासात डोकावले तर अशी अनेक उदाहरणे आढळतात. पानिपतच्या लढाईत सदाशिवराव पेशवे मारले गेले पण त्यांचा तोतया नंतर राज्यात अवतरला ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अगदी काही दशकांपूर्वी नाटकाच्या माध्यमातून लोकप्रिय ठरलेल्या लखोबा लोखंडेचे नाव अजूनही अनेकांच्या ओठावर रुळलेले. समाज प्रगत झाला. कितीही उच्चरवाने सांगत असलो तरी या असल्या ठगांचे प्रकट होणे व त्यांच्याकडून फसवणुकीचे प्रकार काही थांबलेले नाहीत. उलट त्यात वाढच होताना दिसते. या बनवेगिरीला नेमके प्रोत्साहन कशामुळे मिळते? व्यवस्थेतल्या दोषामुळे की समाजात अजूनही भोळसटांची संख्या जास्त असल्यामुळे, यावर विचार करण्याआधी सध्या चर्चेत असलेली तोतयागिरीची काही उदाहरणे नजरेखालून घालणे गरजेचे.

जगात सुरू असलेली युद्धं विविध मार्गांनी आपल्यापर्यंत येऊन भिडली आहेत. माणूस इतिहास घडवतो तसा इतिहासही माणसांना घडवत असतो. अशाच कित्येक युद्धांचा आणि त्यांनी माणसांवर लिहिलेल्या इतिहासाचा मागोवा घेणारी कादंबरी...

# युद्धांनी माणसांवर लिहिलेला इतिहास...

काही कादंबऱ्या – लहान असल्या तरीसुद्धा – वाचायला कठीण असतात. वाचक म्हणून त्या तुम्हाला शब्दांमागून शब्द बकरीसारखे चरू देत नाहीत. थबकवतात, विचार करायला भाग पाडतात आणि तुम्ही 'तसले' वाचक असाल तर आवडलेल्या ओळी अधोरेखित करण्याशिवाय पर्याय नसतो. ॲन मायकल्स या कॅनेडियन कवयित्रीची 'हेल्ड' ही कादंबरी अशा पुस्तकांपैकी एक आहे. या कादंबरीला सलग सरळरेषीय कथानक नाही. रूढार्थाने ही 'ऐतिहासिक कादंबरी' आहे, पण त्यात इतिहासाचा पट तपशिलात रंगवण्यावर फार भर दिलेला नाही. लहानशा तुकड्यातुकड्यांत सांगितलेली ही एका कुटुंबाच्या चार पिढ्यांची १२० वर्षांत पसरलेली कथा आहे. हे तुकडेही सरळ मांडलेले नाहीत – भूत/ भविष्यात मारलेल्या उड्या आहेत. घटना आहेत, त्या घटनांना पात्रांनी दिलेले प्रतिसाद आहेत. प्रसंगी अद्भुताचा वावर आहे. पण ही पात्रांची चरित्रं नाहीत – त्यांच्या आयुष्यातले




मोठमोठे तुकडे कोरे आहेत – त्यावर लेखिका लिहित नाही. कथनातली ती शांतता वाचकाने भरून काढायची आहे.'एका कुटुंबाच्या चार पिढ्यांची कथा' मराठी वाचकाला नवीन नाही. 'मुखवटा' किंवा 'तुंबाडचे खोत' या कादंबऱ्यांच्या संकेतांनुसार 'हेल्ड'चे पत्ते ओळीत लावता येतील. सुरुवात होते ती पहिल्या महायुद्धात जखमी झालेल्या जॉन या ब्रिटिश सैनिकापासून. त्या नृशंस संहारापासून तो मनाने कधीच मुक्त होऊ शकत नाही. तो इंग्लंडमध्ये परततो आणि फोटोग्राफीचा व्यवसाय सुरू करतो. त्यादरम्यान त्याला काही अद्भुत, अतिंद्रिय म्हणावे असे अनुभवही येतात. त्याची पत्नी हेलेना कुशल पण अयशस्वी चित्रकार असते. इंग्लंडमधल्या त्यांच्या वास्तव्यात महायुद्धातल्या मृत/ बेपत्ता सैनिकांच्या कुटुंबीयांचे त्यांना आलेले अनुभव मानवी अस्तित्व, संहार, आणि प्रेमभावनेच्या खोलात घेऊन जातात. जॉन-हेलेना यांची मुलगी ॲना मार्क्सवादी विचारांच्या एका हॅट बनवणाऱ्याशी लग्न करते. तीही वेगवेगळ्या युद्धांमध्ये वैद्यकीय सेवा पुरवते, त्यासाठी सतत युद्धभूमीवर जाते. तिची मुलगी मारा हीदेखील युद्धभूमीवर सेवा पुरवणारी डॉक्टर होते. अशाच एका युद्धभूमीवर तिचा युद्धपत्रकार नवरा तिला भेटतो. एका अतिशय तरल प्रसंगात मारा तिच्या नवऱ्याला ती चार महिने गरोदर असल्याचं सांगते आणि त्याच वेळी तीन आठवडे युद्धभूमीवर जाणार असल्याचंही सांगते. ती परत येणार नाही असं तिच्या नवऱ्याला आणि वडिलांना आतून वाटत आहे, पण मारा आपल्या निर्णयावर ठाम आहे. अद्याप न भोगलेल्या या दु:खाला हे कसे सामोरे जातात हे लेखिका अत्यंत हळुवारपणे रंगवते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंनी मुंबईत उमेदवार बदलला!

## तेजस्वी घोसाळकरांच्या ऐवजी आता विनोद घोसाळकर उमेदवार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने आज दुपारी तिघांची नावे जाहीर केली होती. वर्सोवातून हरुन खान, घाटकोपर पश्चिम येथून संजय भालेराव, विलेपार्ले येथून संदिप नाईक या तिघांची उमेदवारी घोषित करण्यात आली होती. तसंच, घोसाळकर कुटुंबियांनाही एबी फॉर्म दिला होता.**



दहिसर विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी घोसाळकर आणि विनोद घोसाळकर दोघेही इच्छूक होते. त्यामुळे कोणाला उमेदवारी मिळणार हे निश्चित झाले नव्हते. दरम्यान, सायंकाळी आठ वाजून पाच मिनिटांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या अधिकृत एक्स खात्यावरून तेजस्वी घोसाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. परंतु, लागलीच विनोद घोसाळकर यांचं नाव त्या ठिकाणी एडीट करण्यात आलं. त्यामुळे तासाभरात नेमकं काय घडलं हा प्रश्न उपस्थित केला जातोय. ८ फेब्रुवारी रोजी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची फेसबूक लाईव्ह करून हत्या करण्यात आली होती. या हत्येत मॉरिस नोरान्हा उर्फ मॉरिसभाईने यांचं नाव समोर आलं होतं. जनतेत मिसळणारं जोडपं म्हणून घोसाळकर पती-पत्नीची ओळख होती. तर, अभिषेक घोसाळकर यांचे वडील विनोद घोसाळकर हे उद्धव ठाकरे यांचे कट्टर समर्थक आणि या मतदारसंघाचे माजी आमदार राहिले आहेत. त्यामुळे दहीसर विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी घोसाळकर आणि विनोद घोसाळकर यांच्या नावाची चर्चा होती. हे दोघेही निवडणूक लढण्यास इच्छूक होते. परंतु, दोघांच्या नावापैकी एकाचं नाव निश्चित होत नव्हतं. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी घोसाळकर कुटुंबियांकडे एक एबी फॉर्म दिला आणि उमेदवार दोघांपैकी उमेदवार निवडीचं स्वातंत्र्य दिलं. त्यानुसार तेजस्वी घोसाळकर यांचं नाव निश्चित करण्यात आल्याचं पुढे आलं. त्यानुसार, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या अधिकृत एक्स खात्यावरून आठ वाजून पाच मिनिटांनी तेजस्वी घोसाळकर यांचं नाव जाहीर करण्यात आलं. परंतु, तासाभरातच म्हणजे आठ वाजून ५८ मिनिटांनी हे नाव बदलण्यात आलं आणि त्याजागी विनोद घोसाळकर यांचं नाव एडीट करण्यात आलं. त्यामुळे आत दहिसर विधानसभा मतदारसंघासाठी विनोद घोसाळकर यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली आहे. विनोद घोसाळकर हे २००९ साली या मतदारसंघाचे आमदार होते. त्यानंतर २०१४ पासून महायुतीच्या काळात भाजपाच्या मनीषा चौधरी या ठिकाणी निवडून आल्या. परंतु, सध्याची राजकीय समिकरणे वेगळी असल्याने विनोद घोसाळकर यांना पुन्हा एकदा संधी मिळाली आहे.भाजपाने या मतदारसंघातून मनीषा चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे या मतदारसंघातील चूरस वाढली आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी आज वर्सोवातून हरुन खान, मलबार हिल येथून भैरुलाल चौधरी जैन आणि घाटकोपर पश्चिम मतदारसंघातून संजय भालेराव यांना एबी फॉर्म दिले.जनतेत मिसळणारं जोडपं म्हणून घोसाळकर पती-पत्नीची ओळख होती. तर, अभिषेक घोसाळकर यांचे वडील विनोद घोसाळकर हे उद्धव ठाकरे यांचे कट्टर समर्थक आणि या मतदारसंघाचे माजी आमदार राहिले आहेत. त्यामुळे दहीसर विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी घोसाळकर आणि विनोद घोसाळकर यांच्या नावाची चर्चा होती. हे दोघेही निवडणूक लढण्यास इच्छूक होते. परंतु, दोघांच्या नावापैकी एकाचं नाव निश्चित होत नव्हतं.दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी घोसाळकर कुटुंबियांकडे एक एबी फॉर्म दिला आणि उमेदवार दोघांपैकी उमेदवार निवडीचं स्वातंत्र्य दिलं. त्यानुसार तेजस्वी घोसाळकर यांचं नाव निश्चित करण्यात आल्याचं पुढे आलं.

### घोसाळकर यांना पुन्हा एकदा संधी

(उद्धव ठाकरे) पक्षाच्या अधिकृत एक्स खात्यावरून आठ वाजून पाच मिनिटांनी तेजस्वी घोसाळकर यांचं नाव जाहीर करण्यात आलं. परंतु, तासाभरातच म्हणजे आठ वाजून ५८ मिनिटांनी हे नाव बदलण्यात आलं आणि त्याजागी विनोद घोसाळकर यांचं नाव एडीट करण्यात आलं. त्यामुळे आत दहिसर विधानसभा मतदारसंघासाठी विनोद घोसाळकर यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली आहे. विनोद घोसाळकर हे २००९ साली या मतदारसंघाचे आमदार होते. त्यानंतर २०१४ पासून महायुतीच्या काळात भाजपाच्या मनीषा चौधरी या ठिकाणी निवडून आल्या. परंतु, सध्याची राजकीय समिकरणे वेगळी असल्याने विनोद घोसाळकर यांना पुन्हा एकदा संधी मिळाली आहे.

# "टरबूज्या" सोबतची तुरुंगात झालेली ती खास भेट!

## अनिल देशमुखांनी व्यंगचित्रासह केलेली पोस्ट चर्चेत

। अमरावती ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांचं एक व्यंगचित्र पोस्ट करत त्यासह एक पोस्ट लिहिली आहे. जी चांगलीच चर्चेत आली आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीचं घोडामैदान जवळ आलेलं असताना सकाळी ८ वाजता काय गौप्यस्फोट होणार याची चर्चा रंगली आहे.**



"तीन वर्षांपूर्वी प्रतिज्ञापत्र करून खोटे आरोप आदित्य ठाकरे व उद्धव ठाकरेंवर करण्यास मला सांगण्यात आलं. मी त्याला नकार दिल्यामुळे माझ्यावर ईडी व सीबीआयच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली", असं अनिल देशमुखजुलै महिन्यांत म्हणाले होते. "तीन वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी त्यांचा अत्यंत जवळचा माणूस माझ्याकडे पाठवला. त्याने माझं देवेंद्र फडणवीसांशी अनेकदा बोलणं करून दिलं. त्यांनी माझ्याकडे एक लिफाफा पाठवला. त्यातल्या चार मुद्द्यांचं प्रतिज्ञापत्र करून देण्यास मला सांगण्यात आलं होतं. ते जर मी करून दिलं असतं तर तेव्हा उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवार हे अडचणीत आले असते" असंही अनिल देशमुख म्हटलं होतं.उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे त्यावेळी मुख्यमंत्री होते त्यांनी मातोश्रीवर अनिल देशमुखांना बोलवलं त्यांना पैसे गोळा करायला सांगितले या प्रतिज्ञापत्रावर सही करा. दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात हा उल्लेख होता की आदित्य ठाकरेंनी दिशा सालियनवर बलात्कार केला आणि त्यानंतर तिची हत्या केली.

### अनिल देशमुख यांची पोस्ट?

हा उल्लेख असलेल्या प्रतिज्ञापत्रावर सही मागितली. तिसरं प्रतिज्ञापत्र अनिल परब यांच्याबाबत होतं, त्यांनी काही बेकायदेशीर बांधकामं आहेत त्या संदर्भातलं प्रतिज्ञापत्र आहे त्यावर सही करा. चौथ्या प्रतिज्ञापत्रात अजित पवारांचा उल्लेख होता. अजित पवारांनी देवगिरी बंगल्यावर बोलवलं. अजित पवारांचे चिरंजीव पार्थ पवार उपस्थित होते. त्या दोघांच्या उपस्थितीत तुम्हाला (अनिल देशमुख) सांगण्यात आलं आहे की गुटखा विक्री या सगळ्या आरोपांची राळ उठवल्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांचं एक व्यंगचित्र पोस्ट करुन अनिल देशमुखांनी गौप्यस्फोट करण्याचे संकेत दिले आहेत.

# टाटांनी कोटींची संपत्ती सोडली!

## राजन शॉकडे टीटोची देखभाल करण्याची जबाबदारी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टाटा समूहाचे माजी अध्यक्ष आणि प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांनी ९ ऑक्टोबर रोजी जगाचा निरोप घेतला. रतन टाटा यांनी व्यवसायात यश मिळवत रोजगार निर्मिती आणि देशाच्या संपत्तीमध्ये वाढ केली. हे करत असताना त्यांनी माणूसपणही जपले. भूतदया हा त्यांचा महत्त्वाचा गुण. मृत्यूनंतरही रतन टाटांनी ही भूतदया कायम राखली आहे.**



रतन टाटा यांचे श्वान प्रेम सर्वश्रुत आहे. मृत्यूनंतरही आपल्या श्वानाची काळजी घेतली जावी, याची सोय टाटांनी मृत्यूपत्राद्वारे केली आहे. टाइम्स ऑफ इंडियाने रतन टाटांच्या इच्छापत्राबाबत बातमी दिली आहे. यामध्ये त्यांच्या जर्मन शेफर्ड जातीच्या टीटो या श्वानाची काळजी घेण्यासाठी त्यांनी तरतूद केल्याचे नमूद केले आहे. रतन टाटा यांनी आपल्या मागे १० हजार कोटींची संपत्ती सोडली असल्याचे या वृत्तात म्हटले आहे. या संपत्तीमध्ये त्यांनी आपले भाऊ-बहीण, घरात काम करणारे नोकर आणि टीटोसाठी काही भाग सोडला आहे. रतन टाटा यांचा अनेक वर्षांपासून स्वयंपाकी असलेल्या राजन शॉंकडे टीटोची देखभाल करण्याची जबाबदारी दिली आहे. टाटा यांनी आपल्या संपत्तीमधील बराचसा वाटा त्यांच्या संस्थेच्या नावावर केला आहे. तसेच भाऊ जिमी टाटा, सावत्र बहिणी शिरीन आणि डिआना जीजीभॉय संपत्तीचे वाटेकरी केले आहे. रतन टाटांकडे अलिबागच्या समुद्रकिनारी २,००० स्क्वे. फुटांचा बंगला आहे. मुंबईतील जुहू तारा रोड येथे दुमजली बंगला आहे. त्यांच्याकडे ३५० कोटींच्या मुदत ठेवी आहेत. तर टाटा सन्समध्ये ०.८३ टक्के इतकी भागीदारी आहे, अशी माहिती टाइम्स ऑफ इंडियाने दिली आहे. टाटा सन्समधील त्यांची भागीदारी आता रतन टाटा एंडॉवमेंट फाउंडेशनकडे जाणार आहे. तर त्यांना मिळालेले पुरस्कार आणि पारितोषिके टाटा सेंट्रल आर्काइव्हजकडे सुपूर्द केली जाणार आहेत. या माध्यमातून रतन टाटा यांचा वारसा आगामी पिढ्यांनाही कळू शकणार आहे. रतन टाटा हे आपल्या कर्मचाऱ्यांनाही जीव लावत असत. विदेश दौऱ्यावर ते त्यांचा स्वयंपाकी राजन आणि सुबय्या यांना घेऊन जात असत. तिथे ते त्यांच्यासाठी कपडे खरेदी करायचे. सुबय्या हे टाटा यांच्याकडे तीन दशकाहून अधिक काळ काम करत आहेत. याचबरोबर रतन टाटा यांच्या इच्छापत्रात त्यांचा तरुण सहकारी शंतनू नायडूचाही उल्लेख केला आहे.

नायडूच्या गुड फेलोज या कंपनीतील वाटा रतन टाटा यांनी सोडला आहे. तसेच शंतनू नायडूला परदेशात शिक्षण घेण्यासाठी दिलेले कर्जही त्यांनी माफ केले आहे. रतन टाटा यांनी सहा वर्षांपूर्वी जर्मन शेफर्ड टीटोला दत्तक घेतले होते. याच नावाचा त्यांचा आधीचा श्वान दगावला होता. रतन टाटा यांनी श्वानांवर इलाज करण्यासाठी जुलै २०२३ मध्ये महालक्ष्मी येथे एक छोटेखानी रुग्णालय उघडले होते. ज्यामध्ये श्वानांसाठी आयसीयू, सीटी स्कॅन, एक्सरे आणि एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. पाश्चिमात्य देशांत पाळीव प्राण्यांसाठी इच्छापत्रात तरतूद केली जात असते. त्याप्रमाणेच रतन टाटा यांनी टीटोची काळजी घेण्यासाठी त्याची जबाबदारी राजन शॉ यांच्याकडे दिली आहे. रतन टाटा यांचे श्वान प्रेम सर्वश्रुत आहे. मृत्यूनंतरही आपल्या श्वानाची काळजी घेतली जावी, याची सोय टाटांनी मृत्यूपत्राद्वारे केली आहे. रतन टाटांच्या इच्छापत्राबाबत बातमी दिली आहे. जर्मन शेफर्ड जातीच्या टीटो या श्वानाची काळजी घेण्यासाठी त्यांनी तरतूद केल्याचे नमूद केले आहे.

### मृत्यूपत्र कोण अमलात आणणार?

रतन टाटा यांनी आपल्या मागे १० हजार कोटींची संपत्ती सोडली असल्याचे या वृत्तात म्हटले आहे. या संपत्तीमध्ये त्यांनी आपले भाऊ-बहीण, घरात काम करणारे नोकर आणि टीटोसाठी काही भाग सोडला आहे. रतन टाटा यांचा अनेक वर्षांपासून स्वयंपाकी असलेल्या राजन शॉंकडे टीटोची देखभाल करण्याची जबाबदारी दिली आहे. टाटा यांनी आपल्या संपत्तीमधील बराचसा वाटा त्यांच्या संस्थेच्या नावावर केला आहे. तसेच भाऊ जिमी टाटा, सावत्र बहिणी शिरीन आणि डिआना जीजीभॉय संपत्तीचे वाटेकरी केले आहे. रतन टाटांकडे अलिबागच्या समुद्रकिनारी २,००० स्क्वे. फुटांचा बंगला आहे. मुंबईतील जुहू तारा रोड येथे दुमजली बंगला आहे. त्यांच्याकडे ३५० कोटींच्या मुदत ठेवी आहेत. तर टाटा सन्समध्ये ०.८३ टक्के इतकी भागीदारी आहे, अशी माहिती टाइम्स ऑफ इंडियाने दिली आहे. टाटा सन्समधील त्यांची भागीदारी आता रतन टाटा एंडॉवमेंट फाउंडेशनकडे जाणार आहे.

# जर्मनीला भारतीय कामगारांची आवश्यकता का?

## भारतीयांसाठी जर्मनीने वाढवला 'व्हिसा कोटा'

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जर्मनीत सध्या वयोवृद्धांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने कामगारांची कमतरता निर्माण झाली आहे. जर्मनीला कुशल कामगार मिळावे, स्कोल्झ ओलाफ यांनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कामगार व मजुरांची कमतरता भरून काढण्यासाठी जर्मनीने भारतीय नागरिकांसाठी वार्षिक व्हिसा कोटा २०,००० हून ९०,००० हजारांपर्यंत वाढवला आहे.**



यापूर्वी जर्मनीत दरवर्षी फक्त २०,००० हजार भारतीय नागरिकांना व्हिसा दिला जात होता. आता ९०,००० भारतीयांना दरवर्षी व्हिसा देण्याचा निर्णय जर्मनीने घेतला आहे. त्यामुळे आता भारतीय तरुणांना मोठ्या संख्येने जर्मनीत रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच जर्मन व्हिसाचा प्रतिक्षा कालावधीदेखील कमी करण्यात आला आहे. जर्मनीत ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत असल्याने तिथे कामगारांचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी जर्मनीला तरुण कामगारांची आवश्यकता आहे. जर्मनीत २०१४ मध्ये एकूण लोकसंख्येच्या २७ टक्के लोकसंख्या ही ६० वर्षांहून अधिक वय असलेल्या नागरिकांची होती. २०३० पर्यंत जर्मनीतील ३५ टक्के लोकसंख्या ही ६० वर्षांहून अधिक वयोमान असलेल्या नागरिकांची होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे आतापासूनच जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ यांच्याकडून या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पाऊलं उचलली जात आहेत. भारतातून जर्मनीत जाणाऱ्या कामगारांना मुख्यत: अभियांत्रिकी व आयटी क्षेत्रात रोजगाराच्या संधी असतील. तसेच रुग्णसेवा, ज्येष्ठ नागरिकांची सेवा, ट्रक चालक, बालसंगोपन या क्षेत्रांमध्ये देखील रोजगार उपलब्ध होणार आहेत. जर्मनीच्या विदेश मंत्री ॲनालेना बेअरबॉक या देखील भारत दौऱ्यावर आल्या असून त्यांनी नवी दिल्लीत माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, "भारतात कुशल कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत. आम्हाला जर्मनीमध्ये कामगारांची आवश्यकता आहे. निर्णयाचा फायदा हा जर्मनीसह भारताला देखील होणार आहे." दरम्यान, जर्मन चॅन्सेलर ओलाफ स्कोल्झ हे मागील दोन वर्षात तिसऱ्यांदा भारत दौऱ्यावर आले आहेत.

### जर्मन भाषा शिकणे आवश्यक आहे

जर्मनीचे कामगार मंत्री हुबेर्टस हेल म्हणाले, "जर्मनीत नोकरी करण्यासाठी जर्मन भाषा शिकणे आवश्यक आहे. जर्मन भाषा येत असल्यास विविध क्षेत्रात रोजगार मिळू शकतात. परंतु, जर्मन भाषेचे शिक्षण आमच्या देशात येऊन घेतले तर त्याचा आर्थिक फायदा जर्मनीला होईल. आयटी क्षेत्र, रुग्णसेवा व औषधे क्षेत्रात आम्हाला तातडीने कामगार हवे आहेत. जर्मन व्हिसाचा प्रतिक्षा कालावधी कमी करण्यात आला आहे. त्यामुळे जर्मनीत रोजगाराच्या संधी शोधणाऱ्यांना नक्कीच लाभ होणार आहे. त्यांना सुविधा देखील दिल्या जाणार आहेत.

# अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली

'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे. आरती आई झाली आहे, तिने एका महिन्याआधी गोंडस बाळाला जन्म दिला आहे. आरती ४१ व्या वर्षी आई झाली आहे. आरतीने ४ मार्च रोजी मुलाला जन्म दिला असून त्याचं नावही सांगितलं आहे. आरतीच्या पतीचं नाव विशारद बीडासी असून तो चार्टर्ड अकाउंटंट आहे. आरतीने मुलाचं नाव युवान ठेवलं आहे. तिने ती गरोदर असल्याची बातमी का लपवून ठेवली होती, याबद्दल 'हिंदुस्थान टाइम्स' शी बोलताना सांगितलं. "मला वाटत होतं की जेव्हा मला बाळाबद्दल सांगावसं वाटेल तेव्हाच मी सांगेन. आता मला सांगावसं वाटतंय. कारण माझ्या बाळाचा जन्म होऊन एक महिना झाला आहे," असं ती म्हणाली. तसेच सुरुवातीचे काही महिने आपण कपड्यांमुळे प्रेग्नेन्सी लपवली, असं तिने सांगितलं.आरती आणि तिच्या पतीने २०१९ मध्ये अरेंज मॅरेज केलं होतं. लग्नानंतर ते दोघे ऑस्ट्रेलियाला गेले आणि करोना आल्यामुळे तिथेच अडकले. "दूर राहणं तणावपूर्ण होतं, त्या परिस्थिती तुम्ही वेगवेगळ्या भावनांमधून जात असता त्यामुळे गर्भधारणा करू शकत नाही. मी नवीन ठिकाण आणि नवीन लोकांशी जुळवून घेण्यासाठी धडपडत होते, माझ्या शरीरातही खूप बदल होत होते," असं ती म्हणाली. तसेच ४१ व्या वर्षी बाळाला जन्म देणं हे विशीत किंवा तिशीत जन्म देण्याइतकं सोपं नाही, असंही तिने नमूद केलं."आधी माझा गर्भपात झाला होता, त्यामुळे यावेळी मी गर्भधारणेबद्दल न सांगायचं ठरवलं. मला उपचार घ्यावे लागले, तेव्हा मी गरोदर राहिले. बरेच लोक बोलतात ही अभिनेत्री आहे, हिच्याकडे पैसा आहे, त्यामुळे काही अडचण नाही. पण असं नसतं. हे उपचार आरोग्यावर परिणाम करतात. माझं वजन विचित्र पद्धतीने वाढलं, मला औषधांचे दुष्परिणाम जाणवत होते. औषधं घेऊनही मी गरोदर झाले नाही, शेवटी मी सर्व आशा सोडून दिल्या होत्या. पण नंतर मी गरोदर राहिले," असं आरती म्हणाली.'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे.

## माधुरी दीक्षितच्या मनमोहक अदा

९० च्या दशकात माधुरी दीक्षितने आपल्या अभिनयासह दमदार नृत्याने सगळ्यांवर मोहिनी घातली होती. या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. तिला बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून सुद्धा ओळखलं जातं. सध्या माधुरीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. इन्स्टाग्राम रील्सवर अनेक गाणी व्हायरल होत असतात. सध्या आशा भोसले यांचं १९८३ मध्ये प्रदर्शित झालेलं "सलोना सा सजन है...और मैं हू" या गाण्याची नेटकऱ्यांना भुरळ पडली आहे. अगदी माधुरीला सुद्धा या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नाही. अभिनेत्रीने नुकताच या गाण्यावर ब्लॅक अँड व्हाइट व्हिडीओ शेअर केला आहे.आशा भोसलेंच्या या जवळपास ४० वर्षे जुन्या गाण्यावर अभिनेत्रीचा मनमोहक अंदाज पाहायला मिळत आहे. माधुरीने या व्हिडीओमध्ये इंडो-वेस्टर्न लूक करत साडी नेसल्याचं पाहायला मिळत आहे. तिच्या अदाकारीची केवळ नेटकऱ्यांनाच नव्हे तर मराठी अभिनेत्रींना देखील भुरळ पडली आहे.माधुरीच्या व्हिडीओवर क्रांती रेडकरने "ओह माय गॉड तू खरंच बेस्ट आहेस" अशी कमेंट करत लक्ष वेधून घेतलं आहे. तर अमृता खानविलकरने या व्हिडीओवर कमेंट करत "उफ...ग्रेस" असं म्हटलं आहे.

## कुठे आहे मालिनी शर्मा?



डिनो मोरिया, बिपाशा बासूची या भयपटातील रोमँटिक गाणी चर्चा झाली जिचा मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते. विवाहित डिनो मालिनीशी लग्न करण्यास नकार देतो आणि ती गोळी मारून आत्महत्या करते. मग ती भुताच्या रुपात त्याला व बिपाशाला त्रास देते अशी चित्रपटाची कथा होती. या चित्रपटानंतर तिच्या अभिनयाची व सौंदर्याचीही खूप चर्चा झाली.मालिनीने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. तिने करिअरमध्ये अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय ती बॉम्बे वायकिंगच्या 'क्या सूरत है' या गाण्यातही दिसली होती. इतकंच नाही तर अभिनेत्रीने मिका सिंगच्या 'सावन में लग गई आग' या गाण्यात काम केलं होतं.मालिनी शर्माच्या वैयक्तिक आयुष्याविषयी बोलायचं झाल्यास तिने प्रियांशू चॅटर्जीशी लग्न केलं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. चार वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. आता मालिनी शर्मा कुठे आणि काय करते याबद्दल माहिती उपलब्ध नाही.डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते.

## जॅकी श्रॉफ यांचा व्हिडीओ होतोय तुफान व्हायरल

आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण यावेळी त्यांनी चाहत्यांना दिलेल्या वागणुकीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.या व्हिडीओत, जॅकी श्रॉफ फोटो काढण्यात आलेल्या चाहत्याला डोक्यात मारताना दिसत आहेत. तसेच इतरांना दम देताना पाहायला मिळत आहेत. जॅकी श्रॉफ यांनी चाहत्यांना दिलेल्या या वागणुकीवरून नेटकरी भडकले आहेत.एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "त्याला मारलं का? वेडेत आहेत का?" तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे खूप चुकीचं आहे. तुम्ही कोणालाही मारू शकत नाही. चाहते तुमचे मित्र किंवा नातेवाईक नाहीत, ज्यांच्याबरोबर तुम्ही मस्ती कराल." तसेच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हात लावला तर काय झालं? एवढा गर्व नाही पाहिजे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे चुकीचं आहे. सामान्य माणसांना हे आदर देत नाहीत."सध्या जॅकी श्रॉफ यांच्या या व्हिडीओची चांगलीच चर्चा सुरू आहे. पण काही नेटकरी त्यांना आलेले जॅकी श्रॉफ यांचे चांगले अनुभव शेअर करत आहेत.आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत.

## रकुल प्रित सिंहने केली खास पोस्ट



लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिनेत्री रकुल प्रित सिंगनेही धिरज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या व जॅकीच्या लग्नसोहळ्यातील एक खास फोटो शेअर करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रितेश देशमुखचे भाऊ धिरज यांची पत्नी दिपशिखा ही रकुल प्रितची सख्खी नणंद आहे. रकुल व जॅकी यांचं फेब्रुवारी महिन्यात गोव्यात लग्न झालं. लग्नाच्या कार्यक्रमातील एक फोटो रकुलने शेअर केला आहे. या फोटोत रकुल व धिरज देशमुख डान्स करताना दिसत आहेत. 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, येणारं वर्ष आनंदाचं जावो आणि या वर्षात तुम्हाला हवं ते सर्व मिळो,' असं रकुलने या फोटोत धिरज देशमुखांना टॅग करत लिहिलं.रकुल व जॅकीचं लग्न २१ फेब्रुवारी रोजी गोव्यात झालं. मेहुण्याच्या लग्नासाठी धिरज देशमुख गोव्याला गेले होते. त्यांची पत्नी दिपशिखा व मुलं सर्वजण या लग्नासाठी काही दिवस गोव्यात होते.

# विजयानंतर टॉम लॅथम भारावला!

## ऐतिहासिक मालिका जिंकण्याचे श्रेय मिचेल सँटनरला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात भारताला १३२ धावांनी दारुण पराभव स्वीकारावा लागला. या पराभवासह भारताने १२ वर्षांनंतर मायदेशात पहिली कसोटी मालिका गमावली आहे. न्यूझीलंडने ६९ वर्षांनंतर भारताचा बालेकिल्ला भेदत पहिली कसोटी मालिका जिंकली. या ऐतिहासिक कामगिरीनंतर किवी संघाचा कर्णधार टॉम लॅथम खूपच आनंदी दिसत होता. लॅथमने टीम इंडियाविरुद्धची मालिका २-० ने जिंकल्यानंतर या विजयाचे श्रेय दोन खास खेळाडूंना दिले.**




न्यूझीलंड संघाचा कर्णधार टॉम लॅथमने भारताविरुद्ध ऐतिहासिक मालिका जिंकण्याचे श्रेय मिचेल सँटनरला दिले. या फिरकीपटूने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा, अशा एकूण १३ विकेट्स घेत न्यूझीलंडच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेष म्हणजे त्याने दोन्ही डावाता भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला बाद केले. त्याच्या फिरकीचा सामना करताना भारताचे हतबल दिसले. याच कारणामुळे किवी कर्णधाराने त्याला विजयाचे श्रेय दिले.टॉम लॅथम म्हणाला, ‘हा ऐतिहासिक विजय आमच्यासाठी खूपच खास आहे. आमच्या संपूर्ण टीमने एकजूटीने प्रयत्न केल्याने हा मोठा विजय मिळवू शकलो. यामध्ये मिचेल सँटनरचा विशेष उल्लेख करावा लागेल. कारण त्याचा या विजयात सर्वांत जास्त मोलाचा वाटा होता. त्याने दोन्ही डावात विलक्षण गोलंदाजी केली. तो बराच काळ या संघाचा भाग आहे आणि शेवटी त्याला खेळण्याची संधी मिळाली, ज्याचे त्याने सोने केले. या सामन्यात त्याने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, त्यामुळे या विजयाचे श्रेय त्याला जाते.’ग्लेन फिलिप्सबद्दल बोलताना टॉम लॅथम म्हणाला, ‘आज सकाळी ग्लेन फिलिप्स ज्या प्रकारे खेळला, त्याची खेळी खरोखरच महत्त्वाची होती. भारतीय संघ पुनरागमन करणार करेल हे आम्हाला माहीत होते. मात्र, ते इतक्या चांगल्या प्रकारे पुनरागमन करतील हे आम्हाला माहित नव्हते, परंतु आम्ही मधल्या सत्रात विकेट्स घेण्यात यशस्वी झालो. आम्हाला शेवटच्या दोन विकेट्स घ्यायला खूप वेळ लागला, पण जेव्हा टिमने कॅच घेतला, तेव्हा आमच्या आनंदाला पारावार उरला नाही.’ दुसऱ्या सामन्यात टॉम लॅथमने अतिशय शानदार खेळी साकारली. दुसऱ्या डावात त्याने ८६ धावा केल्या, त्यामुळे न्यूझीलंडला भारताविरुद्ध दुसऱ्या डावात २५५ धावा करण्यात यश आले. तसेच, किवी संघाने पहिल्या डावात १०३ धावांची मोठी आघाडी घेतली होती, त्यामुळे भारताला तिसऱ्या दिवशी ३५९ धावांचे लक्ष्य मिळाले होते, ज्याचा पूर्ण करण्यासाठी भारतीय संघाला खूप घाम गाळावा लागला.या सामन्यात न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथमने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय पहिल्या डावात २५९ धावा केल्या.

प्रत्युत्तरात भारतीय संघ अवघ्या १५६ धावांवर गारद झाला. ज्यामुळे पाहुण्या संघाने १०३ धावांची आघाडी मिळवली. त्यानंतर दुसऱ्या डावात किवी संघाने २५५ धावा केल्या. ज्यामुळे न्यूझीलंडने ३६२ धावांचे लक्ष्य दिले. हे लक्ष्य गाठण्यात भारतीय संघ अपयशी ठरला आणि परिणामी संपूर्ण संघ २४५ धावांत गारद झाला. अशा प्रकारे न्यूझीलंडविरुद्ध ११३ धावांनी पराभूत झाल्यामुळे भारताला १२ वर्षांनंतर मायदेशात मालिका गमावावी लागली.न्यूझीलंड संघाचा कर्णधार टॉम लॅथमने भारताविरुद्ध ऐतिहासिक मालिका जिंकण्याचे श्रेय मिचेल सँटनरला दिले.

या फिरकीपटूने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा, अशा एकूण १३ विकेट्स घेत न्यूझीलंडच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेष म्हणजे त्याने दोन्ही डावाता भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला बाद केले. त्याच्या फिरकीचा सामना करताना भारताचे हतबल दिसले. याच कारणामुळे किवी कर्णधाराने त्याला विजयाचे श्रेय दिले.टॉम लॅथम म्हणाला, ‘हा ऐतिहासिक विजय आमच्यासाठी खूपच खास आहे. आमच्या संपूर्ण टीमने एकजूटीने प्रयत्न केल्याने हा मोठा विजय मिळवू शकलो. यामध्ये मिचेल सँटनरचा विशेष उल्लेख करावा लागेल. कारण त्याचा या विजयात सर्वांत जास्त मोलाचा वाटा होता. त्याने दोन्ही डावात विलक्षण गोलंदाजी केली. तो बराच काळ या संघाचा भाग आहे आणि शेवटी त्याला खेळण्याची संधी मिळाली, ज्याचे त्याने सोने केले.

### आमच्या आनंदाला पारावार

या सामन्यात त्याने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, त्यामुळे या विजयाचे श्रेय त्याला जाते.’ग्लेन फिलिप्सबद्दल बोलताना टॉम लॅथम म्हणाला, ‘आज सकाळी ग्लेन फिलिप्स ज्या प्रकारे खेळला, त्याची खेळी खरोखरच महत्त्वाची होती. भारतीय संघ पुनरागमन करणार करेल हे आम्हाला माहीत होते. मात्र, ते इतक्या चांगल्या प्रकारे पुनरागमन करतील हे आम्हाला माहित नव्हते, परंतु आम्ही मधल्या सत्रात विकेट्स घेण्यात यशस्वी झालो. आम्हाला शेवटच्या दोन विकेट्स घ्यायला खूप वेळ लागला, पण जेव्हा टिमने कॅच घेतला, तेव्हा आमच्या आनंदाला पारावार उरला नाही.

# बॉर्डर-गावस्कर मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

## अभिमन्यू इश्वरनसह 2 नव्या चेहऱ्यांना संघात संधी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या दौऱ्यात टीम इंडिया बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी खेळणार असून त्यासाठी भारतीय संघाची घोषणा बीसीसीआयने आज २५ तारखेला केली आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघात जसप्रीत बुमराहला उपकर्णधारपद देण्यात आले आहे. याचबरोबर संघात ३ नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.**




सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे दुखापतीतून सावरत असलेला भारताचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी संघात समावेश करण्यात आलेला नाही.ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणाचा प्रथमच भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी नितीश कुमार रेड्डी याचीही अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे. सलामीवीर अभिमन्यू इसवरनला सुद्धा भारताच्या कसोटी संघात स्थान देण्यात आलं आहे. देशांतर्गत स्पर्धांमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केल्याची पोचपावती आहे, असं नक्कीच म्हणता येईल.अक्षर पटेल आणि कुलदीप यादव हे दोन्ही फिरकीपटू दुखापतीमुळे ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून बाहेर पडले आहेत. वॉशिंग्टन सुंदरचे संघातील स्थान कायम ठेवण्यात आले आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी पुढील महिन्यात २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये सुरू होणार आहे. या मालिकेअंतर्गत दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत.

### गावसकर ट्रॉफीसाठी भारतीय संघ

मालिकेतील पाचवा आणि शेवटचा कसोटी सामना ३ जानेवारीपासून सिडनी येथे खेळवला जाणार आहे.रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, अभिमन्यू ईश्वरन, शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), सर्फराज खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, आकाश दीप, प्रसिध कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर.